महाराष्ट्र शासन

# शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे.

विद्यानगरी, देवपुर , धुळे - ४२४ ००५.
फोन :- ०२५६२-२७२१०३ (कार्या.) Website-www.gpdhule.org.in
Email : principal.gpdhule@dtemaharashtra.gov.in , stores.gpdhule@dtemaharashtra.gov.in

जा.क्र :-शिमदाराशांतनिधु/के.भांडार/भंगार+रद्दी अंतिम विल्हेवाट /२०२१-२२/505 दिनांक :- 19 FEB 2022

## निविदा सुचना

शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे या संस्थेतील विद्यार्थांनी तयार केलेले जुने जॉब (भंगार) व इतर लोखंडी भंगार तसेच विद्यार्थांचे जुनी मॅन्युअल्स /फाईल्स/वर्कशॉप पुस्तके व इतर रद्दी 'आहे त्या स्थितीत' खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निविदा पद्धतीद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. त्याकरीता ईच्छुक खरेदीदारांनी आपल्या जास्तीत जास्त दराच्या निविदा या संस्थेत विहीत कालावधीत सादर कराव्यात.

### अटी व शर्ती यांचा तपशिल खालील प्रमाणे

- स्क्रॅप डिलर ईच्छुकांनी त्यांच्या सिलबंद निविदा या कार्यालयात -आवक/ जावक नोंदणी विभागात दि.१७.०२.२०२२ रोजी सायं ५.०० वाजे पर्यत सादर कराव्यात. टपाल/कुरिअरद्वारे उशीरा प्राप्त होणेसाठी किंवा या कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणांसाठी हे कार्यालया जबाबदार राहणार नाही.
- उल्लेखित रद्दी व भंगाराची पाहणी दि:-०९.०२.२०२२ ते दि:-१७.०२.२०२२ सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळ सकाळी ११:०० ते ०४:०० वाजे पर्यंत राहील. यासंबंधी जास्तीची माहीती आवश्यक असल्यास या संस्थेचे भांडार अधिकारी / भांडारपाल यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.
- प्राप्त झालेल्या निविदा ह्या संस्थेतील गठीत समिती समक्ष दि.१८.०२.२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील.
- सर्व ईच्छुक स्क्रॅप डिलर यांनी निविदा सोबत **Firm Registration copy , GST Acknowledgment Certificate Copy** व **PAN Card** ची स्वत: साक्षांकीत केलेली छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा निविदा विचारात घेण्यात येणार नाहीत .
- संस्थेत उशिराने प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- निविदा दस्तऐवजाच्या प्रत्येक पृष्ठावर स्क्रॅप डीलरची स्वाक्षरी केलेली असावी. अपुर्ण आणि स्वाक्षरी नसलेले निविदा नाकारल्या जातील.
- निविदा या कार्यालयात सादर केल्यानंतर त्यातील दरामध्ये फेरफार करता येणार नाही.
- निविदेतील दर्शविलेली किंमत ही भंगार/रद्दी व वाहतुक खर्च / लोडींग/ कामगार शुल्क इतर सर्व खर्चासह समावेश असणे आवश्यक आहे.
- ईमेलद्वारे पाठविलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
- सर्वाधिक किंमतीच्या निविदेदारास विक्री आदेश संस्थेमार्फत दिला जाईल. सदर सर्व भंगार/रद्दी स्वखर्चाने या संस्थेतुन 'आहे त्या स्थितीत' खरेदी करणे आवश्यक राहील . तसेच किमान बाजारभावाप्रमाणे एवढे अथवा त्यापेक्षा जास्त दराने किंमत न आल्यास विक्री प्रक्रीया रद्द करण्यात येईल.

- विक्री केलेल्या सर्व भंगार/रद्दी वितरण करण्यापुर्वी संबधित विभागामार्फत पडताळणी केली जाईल व तसेच रद्दी /भंगारचे वजन हे संस्थेतील गठीत समिती समक्ष केले जाईल व त्यानुसार निवड झालेल्या खरेदीदाराने त्वरीत कार्यालयात विक्रीची एकुण रक्कम ' प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे नावे DD/ RTGS किंवा रोखीने भरावे. सदर विक्रीची एकुण रक्कम 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे खात्यावर जमा झाल्यावर व तसे याबाबत लेखा विभागाकडुन भंगार विक्री रक्कमेची पावती भांडारात प्राप्त झाल्याशिवाय कोणतेही भंगार /रद्दी जागेवरुन संस्थेबाहेर नेता येणार नाही.
- भंगार/रद्दीचे आदेशान्वये 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे खात्यावर संपुर्ण विक्री रक्कम जमा झाल्यापासुन ०३ दिवसाच्या आत सदर भंगार/रद्दी लोडींग करणे आवश्यक राहील , दरम्यान त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही व तसेच लोडींग करतांना ,वाहतुकी दरम्यान कोणतीही अनुचित घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी किंवा भरपाई करण्याची संस्थेवर राहणार नाही.
- स्क्रॅप डिलरला या संस्थेतील विक्री करण्यात आलेले भंगार/ रद्दी मालाची निवड/ वर्गीकरण/वेल्डींग /कटींग इ. प्रक्रीया संस्था परिसरात करण्याची परवानगी राहणार नाही.
- विक्री केलेली भंगार/रद्दी सोडण्यासाठी गेट पास संबधित स्क्रॅप डिलरच्या नावे तयार केला जाईल.त्याशिवाय विक्री केलेली भंगार/रद्दी नेतायेणार नाही.
- महाराष्ट्र शासनाचे या संबधातील सर्व नियम व कायदे सर्व भंगार विक्रेत्यांना अंतिम लागु व बंधनकारक असतील.
- सदर भंगार/रद्दी विक्री प्रक्रीया पुर्व सुचना न देता मंजुर करणे/नामंजुर करणे/तहकूब करणे/रद्द् करणे /निविदा स्वीकारण्याचे-नाकारण्याचे कोणत्याही कारणास्तव काही कारण न देता इ.बाबतचे संपुर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीकारांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

| SR.NO | TYPE OF SCRAP | APPROX. WEIGHT IN KGS | NAME OF DEPARTMENT |
|---|---|---|---|
| 1 | OLD MANUALS AND FILES ETC | 1590 KGS | CIVIL AND MECHANICAL |
| 2 | OLD STUDENT JOB (SCRAP) | 700 KGS | WORKSHOP |
| 3 | M.S.SCRAP | 700 KGS | WORKSHOP |
| 4 | OLD WORKSHOP BOOKS/FILES | 200 KGS | WORKSHOP |
| 5 | EMPTY BOXES | 30 KGS | MECHANICAL |

(डॉ.आर.जी.वाडेकर)
प्राचार्य,
शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकिय तंत्रनिकेतन,धुळे.

प्रत माहीतीकरिता सविनय सादर :-

१.)मा.संचालक सो,तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य , ३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्रमांक १९६७,मुंबई -४०० ००१- यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

२.)मा.सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , शासकीय तंत्रनिकेतन परिसर सामनगांवरोड, नाशिक रोड,नाशिक - ४२२ १०१ -यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

३.)विभाग प्रमुख,संगणक, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना - संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव.

४.)विभाग प्रमुख - स्थापत्य / यंत्र व कर्मशाळा अधिक्षक - शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.-यांना माहितीस्तव

५.)कार्यालय विभाग, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना माहीती व मुख्य सुचना फलकावर प्रदर्शिक करणेस्तव.